**नि. फौ. ख. क्र. ३३/२०२६**
**सरकार -वि- अमित भास्कर बायस्कार + १**
नि. क्र. १४
CNR No - MHAM120002962026

**<u>दोषारोप</u>**

मी समीर दि. कमलाकर, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, दर्यापूर.

आरोपींची नावे ०१. अमित भास्कर बायस्कार,
वय – ४९ वर्ष, व्यवसाय – शेती,

०२. वेदांत अमित बायस्कार,
वय – १९ वर्ष, व्यवसाय – शिक्षण,
दोघे रा. नरसिंगपूर, ता. दर्यापूर, जि. अमरावती.

याच्यावर खालीलप्रमाणे दोषारोप निश्चित करीत आहे.

दिनांक ०६.१२.२०२५ रोजी सकाळी ०७.०० वाजेच्या सुमारास मौजा नरसिंगपूर, ता. दर्यापूर, जि. अमरावती येथील फिर्यादीच्या घरासमोरील रस्त्यावर तुम्ही तुमच्या समान उद्देशाने फिर्यादी गजानन पंजाबराव बायस्कार याला लोखंडी कडे व लाकडी काठी ज्यांनी मृत्यू होण्याचा संभव आहे अशा हत्यारांनी त्याच्या डोक्याजवळ व उजव्या पायावर मारहाण करुन त्याला इच्छापूर्वक दुखापत पोहोचविली व त्याद्वारे तुम्ही भारतीय न्याय संहितेच्या कलम **११८(१)** सह कलम **३(५)** अन्वये गुन्हा केला आहे, जो या न्यायालयाच्या दखलेत येतो.

याच दिवशी वेळी व ठिकाणी तुम्ही तुमच्या समान उद्देशाने, फिर्यादीला सार्वजनिक ठिकाणी शिवीगाळ करुन अपमानीत केले व त्याद्वारे तुम्ही भारतीय न्याय संहितेच्या कलम **३५२** सह कलम **३(५)** अन्वये गुन्हा केला आहे, जो या न्यायालयाच्या दखलेत येतो.

आणि मी याद्वारे तुमच्याविरुध्द वरील गुन्ह्याकरीता खटला चालवण्याचे निर्देश देतो.

SAMEER DILIP KAMALAKAR
Digitally signed by SAMEER DILIP KAMALAKAR
Date: 2026.07.09 15:55:50 +0530

(स. दि. कमलाकर)
दिनांक ०९.०७.२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, दर्यापूर.

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, आरोपींना उपरोक्त दोषारोप मराठी भाषेत वाचून व समजावून सांगितला.

SAMEER DILIP KAMALAKAR
Digitally signed by SAMEER DILIP KAMALAKAR
Date: 2026.07.09 15:55:45 +0530

(स. दि. कमलाकर)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, दर्यापूर.

दिनांक ०९.०७.२०२६